जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 APR 2018
तरुण भारत

# कुलगुरू डॉ. शिंदेंना एनसीसी मानद कर्नलपदाचा बहुमान

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांना राष्ट्रीय छात्र सेना अर्थात एनसीसी मध्ये 'कर्नल कमांडंट' या मानद कर्नलपदाचा बहुमान प्रदान करण्याचा निर्णय एनसीसीच्या केंद्रीय मुख्यालयाकडून घेण्यात आल्याचे विद्यापीठाला कळविले आहे. २६ एप्रिल रोजी विद्यापीठाच्या प्रांगणात कुलगुरू डॉ. शिंदे यांना विशेष सोहळ्याद्वारे कर्नलपदाचा बहुमान प्रदान करण्यात येणार आहे, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली आहे.

कुलसचिव डॉ. नांदवडेकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, राष्ट्रीय छात्र सेनेच्या नवी दिल्ली येथील मुख्यालयाकडून विद्यापीठाच्या कुलगुरूंना एनसीसीचे मानद कर्नलपद प्रदान केले जाते. एनसीसी च्या विविध उपक्रमांना विद्यापीठ परिक्षेत्रात

प्रोत्साहन व चालना देण्यामधील कुलगुरूंची प्रमुख भूमिका लक्षात घेऊन हा बहुमान त्यांना देण्यात येत असतो. त्यानुसार शिवाजी विद्यापीठास मुंबईस्थित एनसीसी महाराष्ट्र महासंचालनालयाचे अप्पर महासंचालक मेजर जनरल गजेंद्र प्रसाद यांच्याकडून नुकतेच पत्र प्राप्त झाले आहे.



कोल्हापूर ग्रुपचे एनसीसी प्रमुख ब्रिगेडियर पी. एस. राणा, कर्नल एम. आर. चौधरी, कर्नल एफ. एफ. अंकलेश्वरा आणि ऑनररी मेजर रुपा शहा यांनी कुलगुरूंचा भेट घेऊन हे पत्र त्यांना प्रदान केले. त्यानुसार,

**शिवाजी विद्यापीठात २६ एप्रिल रोजी विशेष प्रदान सोहळ्याचे आयोजन**

एनसीसीतर्फे येत्या गुरूवारी २६ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता विद्यापीठात विशेष 'गार्ड ऑफ ऑनर' सोहळ्याचे आयोजन केले आहे. त्यामध्ये कुलगुरू डॉ. शिंदे यांना अत्यंत सन्मानपूर्वक 'मानद कर्नल'पद प्रदान करण्यात येणार आहे.

जनसंपर्क कक्ष
21 APR 2018 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांना एनसीसीचे मानद कर्नलपद

## २६ एप्रिल रोजी विशेष प्रदान सोहळ्याचे आयोजन

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांना राष्ट्रीय छात्रसेना अर्थात एनसीसीमध्ये 'कर्नल कमांडंट' या मानद कर्नलपदाचा बहुमान प्रदान करण्याचा निर्णय एनसीसीच्या केंद्रीय मुख्यालयाकडून घेण्यात आल्याचे विद्यापीठास कळवण्यात आले आहे. गुरुवार, दि. २६ एप्रिल रोजी विद्यापीठाच्या प्रांगणात कुलगुरू डॉ. शिंदे यांना विशेष सोहळ्याद्वारे कर्नलपदाचा बहुमान प्रदान करण्यात येणार आहे, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली आहे.

राष्ट्रीय छात्रसेनेच्या नवी दिल्ली येथील मुख्यालयाकडून विद्यापीठाच्या कुलगुरूंना एनसीसीचे मानद कर्नलपद प्रदान केले जाते. एनसीसीच्या विविध उपक्रमांना विद्यापीठ परिक्षेत्रात प्रोत्साहन व चालना देण्यामधील कुलगुरूंची प्रमुख भूमिका लक्षात घेऊन हा बहुमान त्यांना देण्यात येत असतो. त्यानुसार शिवाजी विद्यापीठास मुंबईस्थित एनसीसी महाराष्ट्र महासंचालनालयाचे अपर महासंचालक मेजर जनरल गजेंद्र प्रसाद यांच्याकडून नुकतेच पत्र प्राप्त झाले आहे. कोल्हापूर ग्रुपचे एनसीसीप्रमुख ब्रिगेडियर पी. एस. राणा, कर्नल एम. आर. चौधरी, कर्नल एफ. एफ. अंकलेश्वरा आणि ऑनररी मेजर रूपा शहा यांनी कुलगुरूंची प्रत्यक्ष भेट घेऊन हे पत्र त्यांना प्रदान केले. त्यानुसार एनसीसीतर्फे येत्या गुरुवारी (दि. २६ एप्रिल) सकाळी १० वाजता विद्यापीठात विशेष 'गार्ड ऑफ ऑनर' सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून, त्यामध्ये कुलगुरू डॉ. शिंदे यांना अत्यंत सन्मानपूर्वक 'मानद कर्नल'पद प्रदान करण्यात येणार आहे. यावेळी कुलगुरू एनसीसीच्या छात्रांकडून सलामी स्वीकारतील.




जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 APR 2018
सकाळ

# डॉ. देवानंद शिंदे यांना 'एनसीसी'चे मानद कर्नलपद

## गुरुवारी विशेष प्रदान सोहळ्याचे आयोजन

सकाळ वृत्तसेवा



कोल्हापूर, ता. २० : शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांना राष्ट्रीय छात्र सेना अर्थात 'एनसीसी'मध्ये 'कर्नल कमांडंट' या मानद कर्नलपदाचा बहुमान प्रदान करण्याचा निर्णय 'एनसीसी'च्या केंद्रीय मुख्यालयाकडून झाला. गुरुवारी (ता. २६) विद्यापीठाच्या प्रांगणात कुलगुरू डॉ. शिंदे यांना विशेष सोहळ्याद्वारे कर्नलपदाचा बहुमान प्रदान करण्यात येणार आहे. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी ही माहिती दिली.

कुलसचिव डॉ. नांदवडेकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, राष्ट्रीय छात्र सेनेच्या नवी दिल्ली येथील मुख्यालयाकडून विद्यापीठाच्या कुलगुरूंना 'एनसीसी'चे मानद कर्नलपद प्रदान केले जाते. 'एनसीसी'च्या विविध उपक्रमांना विद्यापीठ परिक्षेत्रात प्रोत्साहन व चालना देण्यामधील कुलगुरूंची प्रमुख भूमिका लक्षात घेऊन हा बहुमान त्यांना देण्यात येत असतो. त्यानुसार शिवाजी विद्यापीठास मुंबईस्थित 'एनसीसी' महाराष्ट्र महासंचालनालयाचे अपर महासंचालक मेजर जनरल गजेंद्र प्रसाद यांच्याकडून नुकतेच पत्र प्राप्त झाले आहे. कोल्हापूर ग्रुपचे 'एनसीसी'प्रमुख ब्रिगेडियर पी. एस. राणा, कर्नल एम. आर. चौधरी, कर्नल एफ. एफ. अंकलेश्वरा आणि ऑनररी मेजर रूपा शहा यांनी कुलगुरूंची प्रत्यक्ष भेट घेऊन हे पत्र त्यांना प्रदान केले. त्यानुसार, 'एनसीसी'तर्फे येत्या गुरुवारी सकाळी दहाला विद्यापीठात विशेष गार्ड ऑफ ऑनर सोहळ्याचे आयोजन केले आहे. त्यात कुलगुरू डॉ. शिंदे यांना सन्मानपूर्वक मानद कर्नलपद प्रदान करण्यात येईल.

यावेळी कुलगुरू 'एनसीसी'च्या छात्रांकडून सलामी स्वीकारतील. त्यानंतर कुलगुरू पत्रकार परिषदेस संबोधित करतील, अशी माहितीही कुलसचिव डॉ. नांदवडेकर यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 APR 2018
लोकमत

# देवानंद शिंदे यांना 'एनसीसी'चे मानद कर्नलपद

लोकमत न्यूज नेटवर्क

◆ गार्ड ऑफ ऑनर सोहळा गुरुवारी
◆ मेजर जनरल गजेंद्र प्रसाद यांचे पत्र



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांना राष्ट्रीय छात्रसेनामधील (एनसीसी) 'कर्नल कमांडंट' या 'मानद कर्नल'पदाचा बहुमान प्रदान करण्याचा निर्णय एनसीसीच्या केंद्रीय मुख्यालयाने घेतला आहे. विद्यापीठाच्या प्रांगणात गुरुवारी (दि. २६) सकाळी दहा वाजता कुलगुरु डॉ. शिंदे यांना विशेष सोहळ्यामध्ये कर्नलपद प्रदान केले जाणार आहे.

नवी दिल्ली येथील एनसीसीच्या मुख्यालयाकडून विद्यापीठाच्या कुलगुरुंना एनसीसीचे मानद कर्नलपद प्रदान केले जाते. एनसीसीच्या विविध उपक्रमांना विद्यापीठ परिक्षेत्रात प्रोत्साहन व चालना देण्यामधील कुलगुरुंची प्रमुख भूमिका लक्षात घेऊन हा बहुमान त्यांना देण्यात येत असतो. त्यानुसार शिवाजी विद्यापीठाला मुंबईस्थित एनसीसी महाराष्ट्र महासंचालनालयाचे अप्पर महासंचालक मेजर जनरल गजेंद्र प्रसाद यांच्याकडून पत्र प्राप्त झाले आहे. कोल्हापूर ग्रुपचे एनसीसी प्रमुख ब्रिगेडियर पी. एस. राणा, कर्नल एम. आर. चौधरी, कर्नल एफ. एफ. अंकलेश्वरा आणि ऑनररी मेजर रुपा शहा यांनी कुलगुरु डॉ. शिंदे यांची भेट घेऊन हे पत्र त्यांना प्रदान केले. त्यानुसार, एनसीसीतर्फे गुरुवारी 'गार्ड ऑफ ऑनर' विशेष सोहळा होणार आहे, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 APR 2018
पुढारी

# कुलगुरू डॉ. शिंदे यांना एनसीसीचे मानद कर्नलपद

**कोल्हापूर : प्रतिनिधी**



शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांना राष्ट्रीय छात्र सेनेकडून (एन.सी.सी.) कर्नल कमांडंट या मानद कर्नलपदाचा बहुमान प्रदान करण्याचा निर्णय एनसीसीच्या केंद्रीय मुख्यालयाने घेतला आहे. गुरुवारी (दि. २६) विद्यापीठाच्या प्रांगणात कुलगुरू डॉ. शिंदे यांना विशेष कार्यक्रमात कर्नलपदाचा बहुमान दिला जाणार असल्याची माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली.

डॉ. नांदवडेकर म्हणाले, एनसीसीच्या विविध उपक्रमांना विद्यापीठ परिक्षेत्रात प्रोत्साहन व चालना दिल्यामुळे कुलगुरूंना हा बहुमान देण्यात येत आहे. त्यानुसार शिवाजी विद्यापीठास मुंबईस्थित एनसीसी महाराष्ट्र महासंचालनालयाचे अप्पर महासंचालक मेजर जनरल गजेंद्र प्रसाद यांच्याकडून नुकतेच पत्र प्राप्त झाले. कोल्हापूर ग्रुपचे एनसीसी प्रमुख ब्रिगेडियर पी. एस. राणा, कर्नल एम. आर. चौधरी, कर्नल एफ.एफ. अंकलेश्वरा आणि ऑनररी मेजर रूपा शहा यांनी कुलगुरूंची प्रत्यक्ष भेट घेऊन हे पत्र त्यांना दिले.

21 APR 2018
महाराष्ट्र टाईम्स

# कुलगुरू देवानंद शिंदे यांना मानद कर्नलपद



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांना राष्ट्रीय छात्र सेना अर्थात एनसीसीमध्ये 'कर्नल कमांडंट' या मानद कर्नलपदाचा बहुमान प्रदान करण्याचा निर्णय एनसीसीच्या केंद्रीय मुख्यालयाकडून जाहीर केला.

गुरुवारी (ता.२६) सकाळी १० वाजता विद्यापीठाच्या प्रांगणात विशेष 'गार्ड ऑफ ऑनर' सोहळ्याचे आयोजन केले असून, त्यामध्ये डॉ. शिंदे यांना 'मानद कर्नल'पद प्रदान करण्यात येणार आहे. यावेळी कुलगुरू एनसीसीच्या छात्रांकडून सलामी स्वीकारतील, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली.

एनसीसीच्या विविध उपक्रमांना विद्यापीठ परिक्षेत्रात प्रोत्साहन व चालना देण्यामधील कुलगुरूंची प्रमुख भूमिका लक्षात घेऊन हा बहुमान त्यांना देण्यात येत असतो. कोल्हापूर ग्रुपचे एनसीसी प्रमुख ब्रिगेडियर पी. एस. राणा, कर्नल एम. आर. चौधरी, कर्नल एफ. एफ. अंकलेश्वरा आणि ऑनररी मेजर रूपा शहा यांनी कुलगुरू शिंदे यांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांना हे पत्र प्रदान केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

21 APR 2018
लोकमत

**वेळापत्रक जाहीर; अर्ज करण्याच्या प्रक्रियेचा प्रारंभ; सर्व परीक्षांचा समावेश**

# विद्यापीठाच्या प्रवेश परीक्षा यावर्षी ऑनलाईन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील विविध पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या सर्व प्रवेश परीक्षा यावर्षी ऑनलाईन पद्धतीने होणार आहेत. त्याचे वेळापत्रक जाहीर झाले असून ऑनलाईन अर्ज करण्याच्या प्रक्रियेचा शुक्रवारपासून प्रारंभ झाला.



> यावर्षी पहिल्यांदाच विद्यापीठाच्या सर्व प्रवेश परीक्षा ऑनलाईन पद्धतीने होणार आहेत. त्यासाठी प्रश्नांची बँक तयार केली जाणार आहे. विद्यापीठातील विविध अभियांत्रिकी महाविद्यालयांची परीक्षा केंद्रे म्हणून निवड केली आहे. कुलगुरुंच्या मार्गदर्शनाखाली या परीक्षांची तयारी सुरु आहे.
>
> - महेश काकडे, संचालक, परीक्षा व मूल्यामापन मंडळ

विद्यापीठातील एम.ए., एम.एस्सी जिओग्राफी, एम.ए. मास कम्युनिकेशन, एम.एस्सी. अल्कोहल टेक्नॉलॉजी, बी.जे., एम.जे., एम.एस्सी. शुगर टेक्नॉलॉजी, ॲग्रो केमिकल ॲण्ड पेस्ट मॅनेजमेंट, एम.एस्सी. जिओलॉजी, बी.लिब., एम.लिब., एम.एस्सी. इलेक्ट्रॉनिक्स या अभ्यासक्रमांच्या परीक्षा दि. २२ मे रोजी होतील. एम.एस्सी. मायक्रो बायोलॉजी, फार्मास्ट्युकल मायक्रो बायोलॉजी, इंडस्ट्रीयल मायक्रो बायोलॉजी, झूलॉजी, बायो टेक्नॉलॉजी, बायो केमिस्ट्री दि. २३ मे रोजी होणार आहेत. एम.एस्सी. केमिस्ट्री, मॅथेमिटिक्स, फिजिक्स्साठी दि. २४ मे रोजी, तर एम. एस्सी. स्टॅटिस्टिक, अप्लाईड स्टॅटीस्टिक ॲण्ड इर्मोमिटीक, बॉटनी, कॉम्प्युटर सायन्स्साठी दि. २६ मे रोजी परीक्षा होईल. एम.एस्सी. इन्व्हारमेंटल सायन्स्, फूड सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी, एम.एस्सी. टेक (रुलर टेक्नॉलॉजी), एम.बी.ए.करिता दि. २८ मे रोजी आणि एमआरएस आणि एमएसडब्ल्यू अभ्यासक्रमांसाठी दि. २९ मे रोजी परीक्षा घेण्यात येणार आहे. या परीक्षांसाठी (online.shivajiuniversity.in) या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करावे लागणार आहेत. त्यासाठी नियमित शुल्कासह अर्ज करण्याची मुदत दि. २ मेपर्यंत, विलंब शुल्कासह दि. ५ मे, तर अतिविलंब शुल्कासह अर्ज करण्याची मुदत दि. ७ मेपर्यंत आहे. याबाबतची अधिक माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली.

21 APR 2018 सकाळ जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ऑनलाईन प्रवेश अर्ज आजपासून

## विविध अभ्यासक्रमांसाठी २२ मेपासून एंट्रन्स परीक्षा



**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २० : शिवाजी विद्यापीठाच्यां विविध अभ्यासक्रमांसाठी २२ मे पासून प्रवेश परीक्षेस (इंट्रन्स एक्झाम) सुरवात होणार आहे. प्रवेश परीक्षांसाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रवेश अर्ज उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांनी विहित नमुन्यात दिलेले प्रवेश अर्ज भरावेत, त्यासाठी लागणारी आवश्यक कागदपत्रे जोडावीत, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

विद्यापीठाच्या दुसऱ्या सत्रातील विविध अभ्यासक्रमाच्या प्रवेश परीक्षांचे वेळापत्रक प्रशासनाने जाहीर केले. त्यानुसार २२ मे पासून विविध शाखांच्या परीक्षांना सुरवात होणार आहे. या परीक्षांसाठी ऑनलाईन प्रवेश अर्ज भरण्यास सुरवात झाली आहे. परीक्षेसाठीचे आवश्यक शुल्क 'पेमेंट गेट वे'च्या माध्यमातून स्वीकारले जाणार आहे. एम.ए., एमएस्सी भूगोल, एम.ए. मास कम्युनिकेशन, एमएस्सी अल्कोहोल टेक्नॉलॉजी, बॅचलर ऑफ जर्नालिझम (बीजे), मास्टर ऑफ जर्नालिझम (एमजे), एमएस्सी शुगर टेक्नॉलॉजी, एमएस्सी ॲग्रो केमिकल ॲन्ड पास्ट मॅनेजमेंट, एमएस्सी जिऑलॉजी, बी.लीब ॲन्ड इनफरमेशन सायन्स, एम.लीब सायन्स ॲन्ड इनफरमेशन सायन्स, एमएस्सी इलेक्ट्रॉनिक्स् यां विषयाच्या पूर्व परीक्षा २२ मे रोजी होतील.

२३ मे रोजी एमएससी मयक्रोबायोलॉजी, एमएस्सी फार्मासिटीकल मायक्रोबायोलॉजी, इंड्रस्ट्रीयल मायक्रोबायोलॉजी, एमएस्सी जिऑलॉजी, एमएस्सी बायोटेक्नॉलॉजी, एमएस्सी बायोकेमेस्ट्री, एम.ए. इंट्रन्स फॉर आदर फॅकल्टी च्या प्रवेश परीक्षा होतील. २४ मे रोजी एमएस्सी केमिस्ट्री, एम.एस्सी मॅथॅमेटिक्स् एमएस्सी फिजिक्स्च्या परीक्षा होतील. २६ मे रोजी एमएस्सी स्टॅटॅटिकल्स्, एमएस्सी ॲप्लाईड स्टॅटॅटिकल्स् ॲन्ड इनफॉमेटिक्स्, एमएस्सी बॉटनी, एमएस्सी कम्प्युटर सायन्स्ची परीक्षा होईल. २८ मे रोजी एमएस्सी इन्व्हारमेंटल सायन्स, एमएस्सी फूड सायन्स ॲन्ड टेक्नॉलॉजी, एम. टेक, एम.बी.ए.च्या परीक्षा घेण्यात येणार आहेत. तसेच २९ मे रोजी मास्टर ऑफ रुरल स्टडीज (एमआरएस), एम.बी.ए. (रुरल मॅनेजमेंट), एम.एस. डब्ल्यू (रुरल कम्युनिटी डेव्हलपमेंट) आदीच्या परीक्षा होणार आहेत. विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज वेळेत भरावेत. अर्ज भरताना संबधीची विहित कागदपत्रेही जोडावीत आणि विद्यापीठाने जाहीर केलेले परीक्षेसंबधीचे अधिकृत वेळापत्रक पहावे असे आवाहन परीक्षा व मुल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 APR 2018
पुढारी

# विविध अभ्यासक्रमांसाठी २२ मेपासून प्रवेश परीक्षा

**शिवाजी विद्यापीठातून...**

- आजपासून ऑनलाईन प्रवेश अर्ज उपलब्ध
- ऑनलाईन प्रवेश अर्ज भरण्याचे आवाहन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमांसाठी २२ मे २०१८ पासून प्रवेश परीक्षा होणार आहेत. या प्रवेश परीक्षांसाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रवेश अर्ज उपलब्ध आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी विहित कागदपत्रांसह हे अर्ज भरावेत असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या आगामी शैक्षणिक सत्रासाठी विविध अभ्यासक्रमाच्या प्रवेश परीक्षांचे वेळापत्रक प्रशासनाकडून जाहीर करण्यात आले आहे. यानुसार २२ मेपासून विविध परीक्षांना सुरुवात होणार आहे. या प्रवेश परीक्षांसाठी प्रवेश अर्ज ऑनलाईन भरण्यासह यासाठीचे शुल्क पेमेंट गेट वे च्या माध्यमातून स्वीकारले जाणार आहे. विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज वेळेत भरावेत तसेच यासबंधीची विहित कागदपत्रेही जोडावीत असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 APR 2018
तरुण भारत

# विद्यापीठ परीक्षांसाठी प्रवेश अर्ज संकेतस्थळावर उपलब्ध

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या अभ्यासक्रमासाठी २२ मे २०१८ पासून प्रवेश परीक्षा होणार आहेत. या प्रवेश परीक्षांसाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रवेश अर्ज उपलब्ध आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी विहित कागदपत्रांसह हे अर्ज भरावेत, असे आवाहन प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे. शिवाजी विद्यापीठाच्या आगामी शैक्षणिक सत्रासाठी विविध अभ्यासक्रमाच्या प्रवेश परीक्षांचे वेळापत्रक प्रशासनाकडून जाहीर करण्यात आले आहे. त्यानुसार २२ मेपासून विविध परीक्षांना प्रारंभ होत आहे. या प्रवेश परीक्षांसाठी प्रवेश अर्ज ऑनलाईन भरण्यासह यासाठीचे शुल्क पेमेंट गेट वेच्या माध्यमातून स्वीकारले जाणार आहे. विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज वेळेत भरावेत तसेच यासंबंधीची विहित कागदपत्रेही जोडावीत.